# राष्ट्रीय हिंदू आंदोलन

'हिंदु राष्ट्राच्या स्थापने'साठी कार्यरत हिंदुत्ववादी संघटनांचा संयुक्त राष्ट्रीय उपक्रम !

संपर्क : ०९३२२५३३५९५ इ-मेल : hinducoordination@gmail.com

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।

दिनांक :२.२.२०१५

प्रति,

माननीय संपादक

कृपया प्रसिद्धीसाठी

## पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समितीच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात अडीच सहस्र देवीभक्तांचा कोल्हापूर शहरात विराट मोर्चा !

**देवस्थानची इंच अन् इंच भूमी कह्यात घेईपर्यंत लढा देणार ! - धर्माभिमानी हिंदूंचा एकमुखी निर्धार**

कोल्हापूर, २ फेब्रुवारी (वार्ता.) - साडेतीन शक्तीपिठांपैकी एक असलेल्या कोल्हापूर येथील श्री महालक्ष्मी देवस्थानासह ३ सहस्र ६७ मंदिराचे व्यवस्थापन पहाणार्‍या 'पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती'ने केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याच्या विरोधात 'श्री महालक्ष्मी देवस्थान भ्रष्टाचारविरोधी कृती समिती'च्या पुढाकाराने २ फेब्रुवारी या दिवशी भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चासाठी अडीच सहस्रांहून अधिक धर्माभिमानी हिंदू उपस्थित होते. भाविकांनी श्रद्धेने अर्पण केलेले निधी आणि अलंकारांच्या नोंदी नसणे, सहस्रो एकर भूमीची नोंद नसणे, समितीच्या भूमीवर खाणकाम होणार्‍या 'रॉयल्टी'च्या रकमेचा अपहार, श्री महालक्ष्मी देवीच्या नैवैद्यासाठी निष्कृष्ट धान्य देणे यांसह अनेक गैरप्रकार देवस्थान समितीकडून होत आहेत.

या मोर्च्यास सहस्रो देवीभक्तांनी एकजुटीचा हुंकार दाखवत भ्रष्टाचार्‍यांना कठोर शासन करा, सर्व मंदिरे शासनमुक्त करा आणि संपूर्ण प्रकरणाची केंद्रीय अन्वेषण विभागाच्या वतीने चौकशी करावी, अशी एकमुखी मागणी केली. या मोर्च्याच्या माध्यमातून 'श्री महालक्ष्मी देवस्थान भ्रष्टाचारविरोधी कृती समिती'ने राज्यव्यापी आंदोलनाचे रणशिंग २ फेब्रुवारी या दिवशी फुंकले ! गांधी मैदानातून सकाळी ११.३० वाजता मोर्च्याचा प्रारंभ करण्यात आला. या मोर्च्यासाठी सनातनच्या संत पू. (कु.) स्वाती खाडये यांची वंदनीय उपस्थिती होती. १ फेब्रुवारी या दिवशी पुणे, मुंबई येथे याच विषयासाठी आंदोलन झाले, तर रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, रायगड, सोलापूर, धुळे, जळगाव, नंदुरबार, अकोला, यवतमाळ या जिल्ह्यांतही हे आंदोलन होत आहे. या आंदोलनाचे लोण आता प्रत्येक जिल्ह्यात पसरत आहे. बिंदू चौक येथे मोर्च्याची सांगता झाल्यावर विविध मान्यवरांची भाषणे झाली. नंतर कृती समितीच्या वतीने जिल्हाधिकार्‍यांना निवेदन देण्यात आले.

* उपस्थित मान्यवर - बजरंग दलाचे जिल्हाध्यक्ष श्री. संभाजी साळुंखे, शहरप्रमुख श्री. महेश उरसाल, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख श्री. संजय पवार, शहरप्रमुख श्री. शिवाजीराव जाधव आणि श्री. दुर्गेश लिंग्रस, श्री. उदय भोसले, हिंदु एकताचे जिल्हाध्यक्ष श्री. चंद्रकांत बराले, श्री. हिंदराव शेळके, श्री. शिवाजीराव ससे, गुरुकुल मार्शल आर्टचे श्री. शरद माळी, भारतीय जैन संघटनेच्या सौ. मीना जोशी, सौ. नंदा शहा, सौ. सुवर्णा शहा, विहिंपचे शहराध्यक्ष श्री. अशोक रामचंदानी, हिंदु जनजागृती समितीचे श्री. राजन बुणगे, श्री. शिवानंद स्वामी, सनातन संस्थेचे डॉ. मानसिंग शिंदे, अधिवक्ता रणजितसिंह घाटगे, स्वाध्याय परिवाराचे श्री. पुरुषोत्तम पटेल, मनसे जिल्हा सचिव श्री. प्रसाद पाटील यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

* **मोर्च्यात सहभागी संघटना आणि मंडळे** - या मोर्च्यात शिवसेना, आम आदमी पक्ष, श्रीशिवप्रतिष्ठान, हिंदु एकता आंदोलन, विश्व हिंदु परिषद, भाजप, श्रीराम सेना, मनसे, हिंदु महासभा, संयुक्त रविवार पेठ, भारतीय जैन संघटना, स्वाध्याय परिवार, बजरंग दल, श्री संप्रदाय, श्री रेणुका भक्त संघटना, पतंजली योग समिती, भारत स्वाभिमान, योग वेदांत समिती, नाभिक समाज संघटना, व्यापारी मित्र संघटना, व्यापारी महासंघ, विविध रिक्शा संघटना, चेंबर ऑफ कॉमर्स, गुरुकुल मार्शल आर्ट, यांसह अनेक गणेश मंडळे, नामदेव-शिंपी समाज, वारकरी संघटना, इस्कॉन, भारतीय जैन संघटना, युवा भारत, द्रोणागिरी आश्रम, उजळाई येथील विश्वकर्मा सुतार समाज, गुरव समाज, जैन महासंघ, अग्रवाल समाज, विविध मर्दानी आखाडे, जोतिबा सेवा संस्था, कोल्हापूर जिल्हा पुरोहित मंडळ, करवीर निवासीनी पुरोहित मंडळ, शिख समाज, ज्योतिष मंडळ, जंगली महाराज संप्रदाय, प्रजासत्ताक सामाजिक सेवा संस्था, विविध मंदिरांचे भक्त आणि पुजारी, राजवेंद्र स्वामी

मठाचे भक्तगण, आर्ट ऑफ लिव्हिंग, उत्तरादिमठाचे भक्तगण, विविध तरुण मंडळे, मोठ्या संख्येने उपस्थित होती.

**※ भ्रष्टाचाऱ्यांना बिंदू चौकात फाशी द्या !** - श्री. सुनील घनवट, 'श्री महालक्ष्मी देवस्थान भ्रष्टाचारविरोधी कृती समिती'चे प्रवक्ता

आतापर्यंत शासनाने जी जी मंदिरे कह्यात घेतली आहेत, त्या सर्व मंदिरांमध्ये भ्रष्टाचार, अनियमितता आहे. पंढरपूर देवस्थान, शिर्डी संस्थान, श्री सिद्धीविनायक मंदिर यांचे जेव्हा शासकीयीकरण झाले तेव्हा भक्तांचा पैसा हा राजकारण्यांच्या बगलबच्चांनी घशात घातला. त्यामुळे महाराष्ट्रातील जेवढी म्हणून मंदिरे शासनाच्या कह्यात आहेत, तेवढी सगळी मंदिरे शासनाच्या कह्यातून मुक्त करून ती भक्तांच्या कह्यात द्या. 'पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती'ने केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याच्या विरोधात 'श्री महालक्ष्मी देवस्थान भ्रष्टाचारविरोधी कृती समिती'ने कोल्हापूरपासून आंदोलनाचा प्रारंभ केला आहे. कोल्हापूरवासियांनी उभारलेला हा लढा संपूर्ण देशभरासाठी आदर्श असून यातून भ्रष्टाचाऱ्यांना अशी जरब बसली पाहिजे की, यापुढे कोणत्याही मंदिरात भ्रष्टाचार करण्याचा विचारही अन्य कोणाच्या मनात शिवला नाही पाहिजे. या आंदोलनाच्या माध्यमातून 'कोल्हापूर पॅटर्न' सिद्ध झाला आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून आम्ही भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधात एल्गार छेडला आहे.

'पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थापन समिती'ने जो भ्रष्टाचार केला आहे त्यातील इंच अन् इंच भूमी भक्तांच्या कह्यात येईपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही. या भ्रष्टाचाऱ्यांना बिंदू चौकात फाशी द्या, अशी आमची आग्रही मागणी आहे, असे मत श्री. सुनील घनवट यांनी या वेळी व्यक्त केले.

**※ विशेष** - या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी पंढरपूर येथून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर बचाव कृती समितीचे श्री. वैभव बडवे, चिंतामणी उत्पात, वीरेंद्र उत्पात, प्रदीप बडवे, अनिरुद्ध उत्पात हे विशेष करून उपस्थित होते. याच सवमेव बेळगाव येथून श्रीराम सेनेचे श्री. मारुती सुतार यांच्यासह श्रीराम सेनेचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनास माजी उपमहापौर श्री. उदय पवार यांनी पाठिंबा घोषित केला.

**※ क्षणचित्रे**

१. मोर्च्यात कोल्हापूर जिल्ह्यातील ५० हून अधिक गावांतील देवीभक्त, धर्माभिमानी हिंदू उपस्थित होते.

२. या आंदोलनास प्रारंभीपासून शिवसेनेचे धडाधडीचे आमदार श्री. राजेश क्षीरसागर यांचा संपूर्ण पाठिंबा होता. शिवसैनिकांची बैठक घेण्यापासून ते प्रत्यक्षात मोर्च्यात सहभागी होईपर्यंत प्रत्येक कृतीत त्यांचा सहभाग होता. ३० जानेवारी या दिवशी झालेल्या पत्रकार परिषदेसाठी ते स्वत: उपस्थित होते आणि हा विषय त्यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे अधिवेशनात मांडणार असल्याचे सांगितले.

**३. कृती समितीने केवळ २० दिवसांत आंदोलन उभे करून लढा यशस्वी केला !** 'श्री महालक्ष्मी देवस्थान भ्रष्टाचारविरोधी कृती समिती'ने या विषयाला १२ जानेवारी या दिवशी प्रथमत: पत्रकार परिषद घेऊन वाचा फोडली. नंतर केवळ २० दिवस इतक्या अल्प कालावधीत २ फेब्रुवारीचा मोर्चा यशस्वी केला. या आंदोलनाद्वारे कृती समितीने ईश्वरी अधिष्ठान, तळमळ, धडाडी, ध्यास यांद्वारे कोणतेही आंदोलन यशस्वी होऊ शकते, याचा आदर्श समस्त हिंदूंपुढे उभा केला.

४. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान व्यवस्थानरूपी महिषासूर आणि त्याला मारणारी श्री. दुर्गादेवी, तसेच भ्रष्टाचाराचा राक्षस आणि त्याला मारणारी कडकलक्ष्मी असे जिवंत देखावे करण्यात आले होते.

**आपला नम्र,**



**श्री. सुनील घनवट, प्रवक्ता,**
'श्री महालक्ष्मी देवस्थान भ्रष्टाचारविरोधी कृती समिती'
(संपर्क क्रमांक - ९४०४९५६५३४)